# कोकण मर्कन्टाईल को-ऑप. बँक लिमिटेड

वर्ष १९७३ पासून

नोंदणीकृत कार्यालय: १ ला मजला, हार्बर क्रेस्ट, माझगाव टी.टी. मुंबई ४०००१०. । दूरध्वनी : २३७२३७५३, २३७२९१६९, २३७२९१७० २३७२९१७१, २३७३४२०२, २३७३४३११. फॅक्स : २३७४८५८९ । वेबसाईट : www.kokanbank.net


## विक्री सूचना

सर्वसाधारण जनता आणि विशेषत: कर्जदार आणि जामीनदार यांना प्राधिकृत अधिकारी यांच्यातर्फे याद्वारे सूचना देण्यात येते की, कोकण मर्कन्टाईल को-ऑपरेटीव्ह बँक लिमिटेड यांच्याकडे गहाणवट असलेल्या निम्न उल्लेखित मालमत्तांचा सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेटस् ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट कायदा, २००२ च्या तरतुदींन्वये प्रत्यक्ष ताबा घेण्यात आला होता व त्या मे. सुप्रिम लॉजिस्टिक्स, प्रोपा. सामरा मोबिन विरानी यांच्या कर्ज खाते क्र. ५०७१/७३५९ आणि १३०१/३५९९ करिता तारण कर्ज रक्कम रु. १,८९,२३,५०६.२९ (रुपये एक कोटी एकोणनव्वद लाख तेवीस हजार पाचशे सहा व पैसे एकोणतीस मात्र) आणि रु. २,१४,४६,८३३.१३ (रुपये दोन कोटी चौदा लाख सेहेचाळीस हजार आठशे तेहतीस व पैसे तेरा मात्र) आणि मे. व्ही ॲण्ड एस एन्टरप्राईजेसच्या कर्ज खाते क्र. १८०१/३८३१ करिता रु. २,४७,७४,१९७.९४ (रुपये दोन कोटी सत्तेचाळीस लाख चौऱ्याहत्तर हजार एकशे सत्याण्णव मात्र) व त्यावरील १३.५०% द.सा. दराने पुढील व्याजाच्या वसुलीकरिता खाली नमूद केल्यानुसार निविदा सह जाहीर लिलावाद्वारे विक्री करण्यात येतील.

मालमत्तेची विक्री फर्निचर आणि फिक्स्चर्स शिवाय "जसे आहे जेथे आहे आणि जसे आहे जे आहे" तत्वावर/शर्तीवर करण्यात येईल.

| अ. क. | नाव | मालमत्तेचा तपशील | मालमत्तेची स्थिती | राखीव किंमत | इ.र.अ. (रु. मध्ये) | पाहणी दिनांक आणि वेळ | विक्री दिनांक आणि वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| <br><br><br>१.<br><br><br>२.<br><br>३.<br><br>४.<br>५.<br>६.<br><br>१.<br><br><br>२.<br><br>३.<br>४. | कर्ज खाते. १) ५०७१/७३५९ २) १३०१/३५९९, ३) १८०१/३८३१ - माझगाव शाखा<br>मे. सुप्रिम लॉजिस्टिक्स, प्रोपा. सामरा मोबिन विरानी - कर्जदार/ गहाणवटदार<br>श्री. मुबिन एफ. विरानी - गहाणवटदार/हमीदार<br>सौ. झीनत एम. सय्यद चिकटे - हमीदार<br>श्री. एम. सय्यद चिकटे - हमीदार<br>श्री. नावेद अहमद शेख - हमीदार<br>श्री. रियाझ अहमद अली शेख - हमीदार<br>व्ही ॲण्ड एस एन्टरप्राईजेस - प्रोपा. मुबिन एफ. विरानी - कर्जदार/गहाणवटदार<br>सौ. सामरा मोबिन विराना - हमीदार<br>श्री. शमशेर विरानी - हमीदार<br>श्री. फरहान गफूर मालिम - हमीदार | नोंदणीकरण जिल्हा आणि उप जिल्हा शहापूर, जि. ठाणे मधील गाव आटगावच्या नवीन सर्व्हे क्र. ५८/४, ५७/१, २, ३ आणि ५६/१ आणि जुना सर्व्हे क्र. २१९, एच. क्र. ४, स. क्र. २२०, हिस्सा क्र. १, २ आणि ३, आणि स. क्र. २२१, हिस्सा क्र. १ येथील नवीन एन.ए. सर्व्हे क्र. २३२ येथे वसलेल्या आणि असलेल्या गाव आटगाव, आटगाव इंडस्ट्रियल कॉम्प्लेक्, मुंबई नाशिक हायवे, ता. शहापूर, जिल्हा ठाणे येथील घर क्र. ५५४ धारण केलेल्या, भूखंड क्र. २२ वरील फॅक्टरी जमीन आणि इमारत मोजमाप क्षेत्रफळ १००० चौ.मी. आणि इमारत मोजमाप २८८० चौ.फू. (बिल्ट अप). | बँककडे प्रत्यक्ष ताबा | रु. ५५,००,०००/- | रु. ५,५०,०००/- | दि. १६.०६.२०२६ रोजी स. ९.०० ते सायं. ४.०० | दि. २२.०६.२०२६ रोजी स. ११.०० वाजता |

इच्छुक खरेदीदार वर दिलेल्या दिनांक आणि वेळेस मालमत्तेची पाहणी करू शकतात.

वर उल्लेखिलेल्या स्थावर तारण मालमत्तेच्या बाबतीतील तपशील हे निम्नस्वाक्षरीकारांच्या सर्वोत्तम माहिती आणि ज्ञानानुसार नमूद केले आहेत तथापि सदर तपशिलामध्ये असलेल्या कोणत्याही त्रुटी, चुकीची नोंद किंवा काही वगळले गेले असल्यास त्याकरिता ते जबाबदार असणार नाहीत.

जाहीर लिलावाच्या अटी आणि शर्ती :

१) विक्री खाली नमूद केलेल्या अटी आणि शर्तींनुसारच करण्यात येईल.

२) मालमत्ता फर्निचर आणि फिक्स्चर्सशिवाय "जशी आहे जेथे आहे आणि जशी आहे जे आहे" स्थितीवर विक्री करण्यात येईल.

३) लिलावातील मालमत्तेची वर उल्लेखिलेल्या दिनांक आणि वेळेस पाहणी करता येईल. मालमत्तेची पाहणी किंवा निविदा सादरीकरणाशी संबंधित कोणत्याही शंका असल्यास कृपया अधिकृत अधिकारी - कोकण मर्कन्टाईल को-ऑप. बँक लि., १ ला मजला, हार्बर क्रेस्ट, माझगाव टी.टी., मुंबई - ४०००१०. दूरध्वनी : ९८२०५४७७००/९८३३६५७९५५ यांना संपर्क साधावा. इच्छुक खरेदीदार वरील मालमत्तेकरिता त्यांचे प्रस्ताव मोहोरबंद पाकिटात इसारा रक्कम अनामत (इरअ) च्या डिमाण्ड ड्राफ्टसह अधिकृत अधिकारी, कोकण मर्कन्टाईल को-ऑप. बँक लिमिटेड, १ ला मजला, हार्बर क्रेस्ट माझगाव, टी. टी. मुंबई - ४०००१० यांच्या कार्यालयात दि. १२.०६.२०२६ रोजी किंवा त्यापूर्वी पाठवावा. मोहोरबंद पाकिट दि. २२.०६.२०२६ रोजी स. ११.०० वाजता विक्रीच्या वेळेस प्राधिकृत अधिकाऱ्यांतर्फे १ ला मजला, हार्बर क्रेस्ट माझगाव, टी. टी. मुंबई - ४०००१० येथे उपलब्ध इच्छुक बोलीदार, कर्जदार, गहाणवटदार, संमती देणारा पक्ष, पुष्टी करणारा पक्ष आणि जामिनदार यांच्या उपस्थितीमध्ये उघडण्यात येईल.

४) योग्यरित्या न भरलेले प्रस्ताव किंवा सशर्त प्रस्ताव किंवा इरअ न जोडलेले प्रस्ताव किंवा यामध्ये विहीत वरील दिनांक आणि वेळेस न प्राप्त झालेले प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत /वैध मानले जाणार नाहीत आणि त्यानुसार फेटाळण्यात येतील. इसारा रक्कम अनामत वर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.

५) प्रस्ताव दस्तऐवजांसह, इच्छुक बोलीदाराने केवायसी कागदपत्रांची (पॅनकार्ड आणि पत्त्याचा पुरावा) प्रत देखील जोडावयास हवी.

६) कोणत्याही परिस्थितीमध्ये मालमत्ता राखीव किंमतीच्या खाली विक्री करण्यात येणार नाही.

७) प्रतिभूती धनको म्हणजेच कोकण मर्कन्टाईल को-ऑप. बँक लि. द्वारे बोली स्वीकारण्यास अधीन राहून उच्चतम बोलीदार/प्रस्तावदारास मालमत्तेची विक्री केली जाईल. तथापि, आवश्यक असल्यास अंतर्गत बोली, जी त्याच ठिकाणी, दिनांक आणि वेळेस घेण्यात येतील, करू देण्यास मंजूरी देण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकारांना आहे.

८) लिलाव/अंतर्गत बोली त्याच ठिकाणी घेण्यात येईल जेव्हा इच्छुक बोलीदार उपस्थित असतील आणि त्यांचे प्रस्ताव थेट सादर करतील आणि त्यांचे प्रस्ताव वाढवतील.

**९) सदर मालमत्तेच्या संदर्भातील सर्व देणी आणि थकबाकी म्हणजेच महापालिका कर, देखभाल/सोसायटी प्रभार, वीज आणि पाणी कर किंवा इतर कोणतीही देणी व सर्व थकीत देणी यशस्वी बोलीदार/खरेदीदाराने भरावयाची आहेत.**

**१०) यशस्वी बोलीदार/खरेदीदाराने खरेदी किंमतीच्या २५% रक्कम (यापूर्वीच भरलेले इ.र.अ. समायोजित करून) प्राधिकृत अधिकाऱ्याद्वारे विक्रीशी संबंधित प्रस्तावाचा स्वीकार केल्यापासून २ कामकाजांच्या दिवसांमध्ये लगेचच भरावयाची आहे. असे न केल्यास इसारा रक्कम अनामत जप्त केली जाईल.**

**११) विक्री किंमतीची उर्वरित ७५% रक्कम प्राधिकृत अधिकाऱ्याद्वारे यशस्वी खरेदीदारास विक्री निश्चिती कळविल्यापासून १५ दिवसांच्या आत भरावयाची आहे. विक्री किंमतीची शिल्लक ७५% रक्कम किंवा त्याचा कोणताही भाग विहीत कालावधीमध्ये भरण्यास अयशस्वी झाल्यास जमा केलेली रक्कम जप्त केली जाईल आणि प्रतिभुती कर्जदारास सदर मालमत्तेची पुन्हा विक्री करू शकतात आणि थकबाकीदार खरेदीदार मालमत्तेचे किंवा खरेदीकरिता यापूर्वी भरलेल्या रकमेच्या कोणत्याही भागावरील सर्व दावे सोडून द्यावे लागतील.**

१२) विक्री सुरक्षित धनकोद्वारे मंजुरीच्या अधीन असेल.

१३) वर उल्लेखिलेली स्थावर मालमत्ता निम्नस्वाक्षरीकार प्राधिकृत अधिकाऱ्यांद्वारे विक्री निश्चित केल्याच्या दिनांकापासून आग किंवा चोरी किंवा इतर अपघाताद्वारे हानी किंवा नुकसान किंवा इतर धोक्यांसह सर्व बाबतीत यशस्वी खरेदीदाराच्या संपूर्ण जबाबदारीवर असेल. यशस्वी बोलीदार कोणत्याही स्वरुपाच्या कोणत्याही आधारावर वार्षिक विक्रीकरिता पात्र असणार नाही.

१४) सोसायटीची देणी, जर असल्यास, आणि मालमत्तेवरील देणी यासह कोणतीही देय वैधानिक आणि इतर देणी खरेदीदाराने भरावयाची आहेत आणि वर उल्लेखित मालमत्तेकरिता विक्री प्रमाणपत्राच्या नोंदणीकरणाशी संबंधित मुद्रांक शुल्क, नोंदणीकरण शुल्क, हस्तांतरण शुल्क आणि इतर कोणतेही खर्च आणि प्रभार यशस्वी बोलीदाराने भरावयाचे आहेत.

१५) स्वत: इच्छुक बोलीदार/प्रस्तावदार किंवा त्यांनी योग्यरित्या प्राधिकृत केलेला प्रतिनिधी व्यतिरिक्त इतर कोणासही लिलाव/विक्री प्रक्रियेमध्ये भाग घेऊ दिला जाणार नाही.

१६) प्रतिभूती कर्जदाराने भरलेले सर्व शुल्क, प्रभार आणि खर्चासह सर्व देणी जर उपरोल्लेखित कर्जदार, गहाणवटदार, संमती देणारा पक्ष, पुष्टी करणारा पक्ष आणि जामिनदार यांनी लिलावाच्या दिनांकाच्या एक कामकाजाच्या दिवस आधी भरल्यास मालमत्तेची विक्री करण्यात येणार नाही आणि संबंधित बोलीदारांकडून प्राप्त झालेल्या सर्व बोली त्यांना कोकण मर्कन्टाईल को-ऑप. बँक लिमिटेडच्या विरोधातील कोणत्याही दायित्व/दाव्याशिवाय परत करण्यात येतील.

### सरफैसी कायदा २००२ च्या नियम ८ (६) अन्वये वैधानिक १५ दिवसांची विक्री सूचना

कर्जदार, गहाणवटदार, संमती देणारा पक्ष, पुष्टी करणारा पक्ष आणि जामिनदारांना याद्वारे सूचित करण्यात येते की, त्यांनी आजपर्यंतची थकीत असलेली उपरोल्लेखित रक्कम आणि आकस्मिक खर्च आजपासून १५ दिवसांच्या आत भरणा करावेत अन्यथा मालमत्ता विक्रीस ठेवण्यात येईल/विक्री करण्यात येईल आणि शिल्लक देणी जर असल्यास व्याज आणि शुल्कासह वसूल करण्यात येईल.

ठिकाण : मुंबई

दिनांक : ०५.०६.२०२६

प्राधिकृत अधिकारी

सही/-

कोकण मर्कन्टाईल को-ऑप. बँक लि. करिता